**दिवाणी दावा क्र.२६/२०१४**

**निशाणी क्र.५६ खालील आदेश**
(दिनांक १८ सप्टेबर, २०१८)

१. प्रतिवादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये लेखी जबाबामध्ये दुरुस्ती करण्याकरीता केलेला आहे. लेखी जबाबातील परिच्छेत नं.३ नंतर ३-अ समाविष्ट करुन अर्जात नमूद केल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास प्रतिवादींनी परवानगी मागितली आहे. वादीने सदर अर्जास विरोध केला असून दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात येवू नये अशी विनंती केली आहे.

२. दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ६ नियम १७ अन्वये कोणत्याही पक्षकाराला दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये त्याच्या कथनामध्ये त्यांच्यातील मुख्य वाद मुद्दा निवारण करण्याच्या अनुषंगाने असणारी आवश्यक ती दुरुस्ती करता येईल अशी तरतुद आहे. वादीने दाव्यामध्ये नि.क्र. ३९ वरील अर्जानुसार दुरुस्ती केलेली आहे. सदर दुरुस्तीबाबत प्रतिवादीला लेखी जबाबामध्ये दुरुस्ती करुन म्हणणे सादर करणे गरजेचे आहे, परंतू तशी दुरुस्ती अद्याप केलेली नाही. प्रतिवादींनी नविन वकील नेमल्यानंतर अशी दुरुस्ती करणे गरजेचे आहे हे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे दुरुस्ती करण्यास परवानगी मागितलेली आहे हे प्रतिवादींचे कथन बरोबर वाटते. वादीने दाव्यात दुरुस्ती केल्यामुळे त्याबाबत प्रतिवादींचे म्हणणे मांडण्यास परवानगी देणे उचित होईल. सदरची दुरुस्ती करण्यास प्रतिवादीला परवानगी दिल्यास वादीला हानी पोहचू शकत नाही. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. निशाणी क्र. ५६ वरिल प्रतिवादींचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.
२. प्रतिवादींनी दिनांक २५.०९.२०१८ पर्यंत दुरुस्ती करावी.

(मा. ये. वाघ)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
रामटेक

दिनांक : १८.०९.२०१८
रामटेक

**Endorsement**

| | | |
|---|---|---|
| Case argued on | : | 18/09/2018 |
| Order dictated on | : | 18/09/2018 |
| Transcription ready on | : | 18/09/2018 |
| Order Checked and signed on | : | 18/09/2018 |